# सहाव्या लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव 'लिफफि २०२१'चे यावर्षीही ऑनलाईन आयोजन

लोणावळा, दि. १ : सहाव्या लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे (लिफफी – २०२१) आयोजन यावर्षीही ऑनलाईन करण्यात येत आहे. दि. २४ ते २६ सप्टेंबर रोजी याचे प्रसारण झाले असून १ ते ३ ऑक्टोबर व ८ ते १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता सदर चित्रपट प्रसारित होणार आहेत. यामध्ये दिवंगत सिनेनिर्माते शक्ती सामंता यांचे संस्मरणीय चित्रपट प्रसारित करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे.

माधव तोडी यांचेकडे पूर्ण महोत्सवाची मुख्य संचालनाची जबाबदारी असून विवेक वासवानी हे कार्यक्रम प्रमुख आहेत. महोत्सवात प्रसारित होणाऱ्या चित्रपटांना अभिजात दर्जा का व कसा मिळावा याबर चित्रपट प्रसारणाआधी चर्चा होणार असून यात आशिम सामंता, संदिप सोपारकर, पूजा देसाई, ब्रह्मानंद सिंह, ज्योतिन गोयल, तुषार भाटीया, दिव्य सोलगामा आदी सहभाग घेतील.

एकूण ९ चित्रपट या महोत्सवात प्रसारित केले जातील. यातील तीन चित्रपट आधी झाले आहेत. प्रेक्षकांना घरातूनच या चित्रपटाचा आस्वाद घेता येणार असून त्यांना चर्चेमध्येही सहभागी होता येणार आहे. गेल्या वर्षीही या महोत्सवाला उदंड प्रतिसाद मिळाला होता. कोरोना कालखंडआधी लोणावळा येथील 'ट्रायोझ प्लाझा' रायवूड येथे महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सिनेजगतातील नामांकित, दिग्गज याकरिता उपस्थित होते.

प्रथम भागात शम्मी कपूर विशेष चित्रपट प्रसारीत करण्यात आले असून, दुसऱ्या भागामध्ये राजेश खन्ना व तिसऱ्या भागात संमिश्र चित्रपट प्रसारित केले जातील.

याविषयी बोलताना माधव तोडी म्हणाले, रंजक चित्रपटांच्या मेजवानी बरोबरच तज्ञांबरोबर चर्चा, गप्पचर्चा व कार्यशाळा यांच्या माध्यमातून मनोरंजन व प्रबोधन या दोन्ही गोष्टी आम्ही साधणार आहोत. यआधी महोत्सवात श्याम बेनेगल, नसिरुद्दीन शहा, शबाना आझमी, केतन मेहता, गोविंद निहलानी, सुधीर मिश्रा, दीपा साही, रणजीत कपूर, मुकेश खन्ना, केवलजीत सिंग या मातब्बर निर्माते व कलाकारांनी हजेरी लावली आहे. तर अनंत महादेवन, विवेक वासवानी, रिंकी भट्टाचार्य, मयांक शेलार, जॉय सेनगुप्ता, तुषार भाटीया, संदिप सोपारकर यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले आहे. विविध मीडिया, स्कूलमधील विद्यार्थी वर्गाला याचा फायदा झाला आहे. चित्रपट पाहण्यासाठी 'प्लेक्सिगो' हे मोबाईल ॲप वापरायचे असून www.onelink.to/plexigo वर जाऊन डाऊनलोड करावे लागेल.

अधिक माहितीसाठी
www.liffi.in किंवा फेसबुक
https://www.facebook.com/LIFFIIndia, इन्स्टाग्राम : lffiffi_india